| | |
|---|---|
| ला. प्र. वि. | **कार्यालय, पोलीस उप अधिक्षक,**<br>**लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, जालना**<br>टोल फ्री क्रमांक - 1064<br>कार्यालय दुरध्वनी क्र :- 02482-220252<br>ई मेल - dyspacbjalana@gmail.com |

:: **प्रेस नोट** ::                                        **दिनांक :- 02.10.2021.**

**गुन्हयात आरोपी न करता तपासात मदत करण्यासाठी पोलीस ठाणे तालुका जालना येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री.सुरेश बापुराव कासुळे व पोलीस अंमलदार श्री. चरणसिंग विजयसिंग सिंगल यांना तक्रारदाराकडुन 30,000/- रुपयेची लाच स्विकारतांना पकडले.**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | आरोपीचे नाव, हुद्दा व पत्ता | :- | 1. श्री. सुरेश बापुराव कासुळे, वय 36 वर्ष व्यवसाय नोकरी, सहाय्यक पोलीस निरीक्षक नेमणुक पोलीस ठाणे तालुका जालना, मुळ रा. भालगाव ता. पाथर्डी जि. अहमदनगर हमु. स्पंदन बिल्डींग, यशवंतनगर, अंबड रोड, जालना<br>2. श्री. चरणसिंग विजयसिंग सिंगल वय 32 वर्ष व्यवसाय नोकरी, पोकॉ/182 नेमणुक पोलीस ठाणे तालुका जालना मुळ रा. आरदखेडाबाडी ता. जाफ्राबाद जि. जालना हमु.सर्व्हे नं. 488 पोलीस क्वार्टर, 209/250 पोलीस मुख्यालय, जालना |
| 2 | गुन्हा घ ता व ठिकाण | :- | दि- 02.10.2021 रोजी पोलीस ठाणे तालुका जालना जि. जालना येथील |
| 3 | लाच स्विकारली रक्कम | :- | 30,000/- रुपये. |

याबाबत हकीगत अशी की, यातील तक्रारदार यांनी तक्रार दिली की, पोलीस ठाणे तालुका जालना येथे मागील काही दिवसांपुर्वी दाखल झालेल्या रेडयांच्या टक्करीचा गुन्हा दाखल असुन त्या गुन्हयात तक्रारदार याचे नाव आहे, त्यामुळे त्यास गुन्हयात अटक करायचे आहे, असे सांगुन आलोसे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. सुरेश कासुळे व पोलीस कर्मचारी श्री. सिंगल यांनी पोलीस ठाण्यात बोलावुन त्यांना सदरील गुन्हयात आरोपी न करता तपासात मदत करण्यासाठी 30,000/- रुपये लाचेची मागणी केली. सदर कामासाठी तक्रारदारास आलोसे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. सुरेश कासुळे व पोलीस कर्मचारी श्री. सिंगल यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना येथे संपर्क साधून तक्रार दिली.

सदर तक्रारीवरुन दि. 02.10.2021 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना यांनी लाच मागणी पडताळणी केली असता आलोसे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. सुरेश कासुळे व पोलीस कर्मचारी श्री. सिंगल यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांना रेडयांच्या टक्करीचे दाखल गुन्हयात आरोपी न करता तपासात मदत करण्यासाठी 30,000/- रुपये लाचेची मागणी करुन सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. सुरेश कासुळे यांनी पोलीस अंमलदार श्री. चरणसिंग सिंगल यांना लाचेची रक्कम स्वीकारण्यास सांगितल्याचे निष्पण्ण झाले, त्यावरुन पोलीस अंमलदार श्री. चरणसिंग सिंगल यांना तक्रारदार यांचेकडुन 30,000/- रुपये लाचेची रक्कम स्विकारतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालनाचे पथकाने पोलीस ठाणे तालुका जालना, जि. जालना येथे रंगेहाथ पकडले आहे.

लोकसेवक 1. श्री. सुरेश बापुराव कासुळे, वय 36 वर्ष व्यवसाय नोकरी, सहाय्यक पोलीस निरीक्षक नेमणुक पोलीस ठाणे तालुका जालना, मुळ रा. भालगाव ता. पाथर्डी जि. अहमदनगर हमु. स्पंदन बिल्डींग, यशवंतनगर, अंबड रोड, जालना 2. श्री. चरणसिंग विजयसिंग सिंगल वय 32 वर्ष व्यवसाय नोकरी, पोकॉ/182 नेमणुक पोलीस ठाणे तालुका जालना मुळ रा. आरदखेडाबाडी ता. जाफ्राबाद जि. जालना हमु.सर्व्हे नं. 488 पोलीस क्वार्टर, 209/250 पोलीस मुख्यालय, जालना यांचे विरुध्द पोलीस ठाणे तालुका जि. जालना येथे गुन्हा दाखल करणे बाबत पुढील कार्यवाही चालु आहे.

**तसेच अॅन्टी करप्शन ब्युरो कडुन आवाहन करण्यात येते की, कोणी लोकसेवक शासकीय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास किंवा खाजगी व्यक्ती मार्फत कोणी लाचेची मागणी करीत असल्यास 02482-220252, तसेच टोल फ्री क्रमांक 1064 वर संपर्क करावा. तसेच पोलीस उप अधिक्षक मो.न. 9823365677, पोलीस निरीक्षक मो.नं. 8390757835, 9823216788 वर संपर्क करावा.**

पोलीस उप अधिक्षक,
ला प्र वि, जालना.